
# ११ माझ्या आज्यानं पंज्यानं


• ऐका. म्हणा. वाचा.



माझ्या आज्यानं पंज्यानं
रोज इनल्या येसणी,
तुझ्या मातले गोरपे
तवा करीती पेरणी.



माझ्या आज्यानं पंज्यानं
किती इनल्या गोफणी,
तवा नेमानं चालते
तुझ्या रानाची राखणी.



माझ्या आज्यानं पंज्यानं
रोज वळली चऱ्हाटं,
पाट भरून वाह्याची
तुझ्या रानातली मोटं.



माझ्या आज्यानं पंज्यानं
रोज इनल्या रं बाजा,
येतो दमून रेघाळ्या
पाठ टेकवितो राज्या.

माझ्या आज्यानं पंज्यानं
रोज वळल्यात काण्या,
तुझ्या दुभत्या म्हशीला
रोज बांधया दावण्या.



माझ्या आज्यानं पंज्यानं
पोरं घातली साळंला,
कष्टकऱ्याच्या जिण्याला
दिस सोनियाचा आला.

**शंकर अभिमान कसबे**–(जन्म–१९८२) नवोदित कवी. नियतकालिकांतून लेखन, विविध कविसंमेलनांत सहभाग. 'करपी' हा कवितासंग्रह प्रसिद्ध. 'करपी' या कवितासंग्रहातून ही कविता घेतली आहे.

आपल्या पूर्वजांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून नव्या पिढीला शिकवले. त्यांच्याविषयी कृतज्ञतेची भावना या कवितेतून कवीने व्यक्त केली आहे.

## स्वाध्याय



**प्र. १. तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवीच्या आजोबा–पणजोबांनी गोफणी व चऱ्हाटं वळल्यामुळे कोणती कामे करता आली?

(आ) कवीच्या आजोबा–पणजोबांनी विणलेल्या बाजेचा उपयोग केव्हा व कशासाठी केला?

**प्र. २. शेतीकामासाठी वापरली जाणारी साधने व त्यांचा उपयोग लिहा.**

| | | |
|---|---|---|
| (अ) येसणी – | (इ) चऱ्हाट – | (उ) काण्या – |
| (आ) गोफणी – | (ई) बाजा – | (ऊ) दावणी – |

### खेळूया शब्दांशी.

**(अ) शेवटचे अक्षर सारखे येणाऱ्या पाच शब्दांच्या जोड्या कवितेतून शोधून लिहा.**

**(आ) आकृतीत दिलेले ग्रामीण भाषेतील शब्द प्रमाणभाषेत लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (अ) | इनल्या | विणल्या | (इ) | वाह्याची | |
| (आ) | तवा | | (ई) | साळंला | |

### शोध घेऊया.

**(अ) तुमच्या आईबाबांना विचारून तुमच्या घरातील आजोबा–पणजोबांनी घेऊन ठेवलेल्या किंवा स्वत: तयार केलेल्या वस्तूंची यादी करा.**

**(आ) आंतरजालाच्या साहाय्याने शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या आधुनिक साधनांची माहिती घ्या.**

**उपक्रम :** कौटुंबिक नातेसंबंधावर आधारित कविता मिळवा, त्याचा संग्रह करा.
उदा., आई, आजी, मावशी, ताई, वडील, आजोबा.

### भाषेची गंमत पाहूया.

- **मराठी विलोमपद म्हणजे असे वाक्य जे उलटे वाचले तरी अगदी तसेच असते.**

उदा., (१) चिमा काय कामाची
(२) भाऊ तळ्यात ऊभा
(३) काका, वाचवा, काका
(४) तो कवी डालडा विकतो
(५) हाच तो चहा
(६) तो कवी ठमाला माठ विकतो

तुम्हीही अशा प्रकारची वाक्ये तयार करून लिहा. पहा कशी गंमत येते.

# भाषेचे नमुने

**पुरुषोत्तम बोरकर**–(जन्म–१९५५) कादंबरीकार, लघुकथाकार, नाट्यलेखक, पटकथालेखक, दूरदर्शनमालिका लेखक, माजी संपादक व स्तंभलेखक. 'मेड इन इंडिया' या कादंबरीतून हा उतारा घेतलेला आहे.

महाराष्ट्रात विविध बोली बोलल्या जातात. अशा बोलींची आपण ओळख करून घेत आहोत. वऱ्हाडी व मराठवाडी या दोन बोलींचे उतारे दिलेले आहेत.

## १. वऱ्हाडी बोली

''आईमाय च्या काहाले करा लागत होता वं?''आई म्हन्ते, ''म्या च्यालेस्तं बलावू धाळलं गळ्याकून तुमाले? सकाऊन तुमी न्हानोऱ्यात गुतून पळल्या होत्या, नाहीतं सकाऊनच बलावलं असतं. मंग सैपाकपानी झाल्यावर म्या गळ्याले म्हटलं, नथ्थू, लगनघरी जाय अन् त्या येवद्याच्या पाव्हनीनले च्यापान्याले घेऊन ये. घ्या, थंडा हुईन...'' ''तुमी घ्याना. घेना घेना तुमी घेना. तुमी मोठ्या आहा ना बाई... चूप पोट्ट्या. आगावर च्या सांडतं काय आता? चूप बस व तुही कुस्मे. काय झालं तुमा दोघाइलेही?'' ''त्याह्यले देऊ का च्या?'' ''नाही नाही त्याईले काहाले पाह्यजे च्या? दुसरा नोका देऊ, याच्यातलाच देतो मी. हैठ. आयकतही नाही तुमी. हे त सती पळतात चहाचा सिंगल दिसला की....''

यावर आई म्हन्ते, "म्या आगुदरच ठेवला होता ज्यास्तीचा. वक्तावर कोनी आलं तं मंग पंच्याईत होते. घ्या पान घ्या." यावर पाव्हनीन म्हन्ते, "आमीही साकरीचाच चाहा घेतो. गुयाचा चाहा त मले घेतल्यासारखा वाटतच नाही. अळकित्ता कुठी आहे? तू बसला का पोट्ट्या अळकित्त्यावर? उठ उभा राह्य. हे पोट्टे मिनिटभर कोनाशी बोलू देतीन त शप्पत आहे." "आता त्याले रुपया काहाले द्या लागते बयना !"

दरम्यान आई मावदातून कुकाचं डाबलं आनते अन् पाव्हनीनच्या कपाई कुकू लावते. पाव्हनीन आइच्या लावते. आई म्हन्ते, "येजा गावाले जाच्या आगुदर आखीन येकडाव." पाव्हनीन म्हन्ते, "हो ईन ना. ईन ईन. तथी लगनघरी त माय उभं राहाले जागा नाही. निरा कलकल कलकल चालू असते उठल्यापासून त झोपेलोग. अन् नासाचा धूस त इतला माय की आपल्याच्यानं तं पाहोल्या जात नाही. असलं त काय अति करा अम नसलं त काय माती करा? माह्य त डोक्सचं भिन झालं बयना म्हन्सीन त त्या कलकलाटानं. पन ईन मी. मले त आखीन साताठ जागी बलावू आहे. तोंड गोळ असलं ना मान्साचं त त्याले काहाची निपूर नाही पळत बयना. नाहीतरी वर जाताखेपी संग काय न्या लागते दुसरं?''

- **मनाने उत्तरे लिहा.**

(अ) 'असलं त काय अति करा अम नसलं त काय माती करा?' या म्हणीचा अर्थ काय असेल याचा विचार करा व लिहा.

(आ) कुकाचं डाबलं, अळकित्ता ही वऱ्हाडी बोलीतील वस्तूंची नावे आहेत. तुमच्या परिसरात या वस्तूंना कोणती नावे आहेत ते लिहा.

**बालाजी मदन इंगळे-**(जन्म-१९७५) समोर येणाऱ्या प्रत्येक संकटाकडे संधी म्हणून पाहावयाची दृष्टी असलेले सकारात्मक विचारांचे लेखक. 'मातरं', 'स्पंदन', 'मेलं नाही अजून आभाळ....' हे कवितासंग्रह आणि 'झिम पोरी झिम' कादंबरी प्रसिद्ध.

ही मराठवाडी बोली कर्नाटक सरहद्दीवरील उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा या भागात बोलली जाते. 'झिम पोरी झिम' या कादंबरीतून हा उतारा घेतलेला आहे.

## २. मराठवाडी बोली

एके दिवशी मी दुपारी अभ्यास करत बसलते. शंकर झोपलता. अर्धा घंटा झालासंल तर शंकर एकाकीच उठला अन् रडलाला. मी गप्पमन् शंकरला पाळण्यातून खाली घेटले. तरीबी रडायचं थांबना गेलं. मग वाटीत दूध घिवून पाजिवलाले, तर रोज गप्प दूध पेणारा शंकर आज रडतच दूध पिऊलाला. दूध प्याचं झालं, तरीबी शंकर रडायचं थांबना. मग मी मांडीवर घिवून हलवीत थोडं थापटले. तरीबी गप्प बसंना. मग पाळण्यात झोपवले तरीबी गप्प बसंना. मग पाळण्यातून काढून काखंत घेतले. खांद्यावर घिवून थापटले. तरी रडायचं थांबना. का बरं गप्प बसना की ! मी घाबरून गेले. का झालासंल माय? रडायचं थांबना का बरं? का काय चावलंय म्हणावं ? मी लगेच शंकरच्या आंगातली आंगी काढून बघितले. हाता-पायाला पुढं पोटावर मागं पाठीवर सगळीकडं बघितले. पर कुठंच काय दिसलंनी. मग का बरं रडतासंल माय... ह्या विचारात आता मला काय करावं कळंना.

तेवढ्यात दारात कोणतर आल्यावनी वाटलं. बघितले तर रामतात्याची सून निलव्वा होती. आता तिला थोडं मराठी बोलाया यिवलालतं. शंकर रडलाल्याला बघूनच आलती. आल्या आल्या म्हणली, "अई का झालं ओ?" मी म्हणले, "काय झालंय की बघा. एकाकीच रडूलालय. आता दूध पाजिवलेव तरीबी गप्प बसंना." "अई यव्वो का झालं म्हणावं ?" आसं म्हणत शंकरला घेतली. जरा त्येला बोलली, खेळवली तरीबी शंकर गप्प बसंना. मग त्येला खेळवीत बाहीर घिवून गेली. आपल्या घरात घेऊन गेली. मी लई घाबरले. आता अई का म्हणत्यात की वाटलालं. शंकरला काय तर झाल्यावर कसं वाटलालं. निलव्वा शंकरला मग तिच्या घरातल्या बैलाच्या घागरमाळा वाजवून दाखवली. मग शंकर त्या आवाजाकडं बघितला. अन् जरा रडायचं गप्प झाला, तरी अधून-मधून जरा रडूचलाला. मग निलव्वानं जरा घिवून इकडं-तिकडं फिरली. तिच्याच खांद्यावर मग शंकर थोड्या वेळानं झोपला. मग तिनंच घरी आणून पाळण्यात झोपवली. मला बरं वाटलं. जीवात जीव आला.

- **मनाने उत्तर लिहा.**

  तुमच्यावर तुमच्या लहान भावंडांना किंवा एखाद्या छोट्या बाळाला सांभाळण्याची वेळ आली आहे का? तुमचा अनुभव लिहा.

**शिक्षकांसाठी :** बोलीभाषेतील दोन्ही उतारे विद्यार्थ्यांना योग्य उच्चार करून लिहिलेल्या शब्दांप्रमाणे वाचून दाखवावे. त्या उताऱ्यांतील शब्दांचे अर्थ व भाषेचे वेगळेपण विद्यार्थ्यांना समजून सांगावे.